महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

मासं/रवका//न.क्र.३४८/२७०४३
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,
माटुंगा, मुंबई ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३
**दिनांक: १४.१०.२०२२**

# परिपत्रक

**विषय:- "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" च्या औचित्यानुसार कंपनीच्या कार्यालयांतील दूरध्वनी/ भ्रमणध्वनीवर अभ्यागतांशी किंवा सहकारी अधिकारी/ कर्मचारी यांच्याशी करावयाच्या संभाषणाची सुरुवात "हॅलो" ऐवजी "वंदे मातरम्" या अभिवादनाने करण्याबाबत.**

"आजादी का अमृत महोत्सव" अर्थात "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" च्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी पारित केलेले आदेश व सूचना कंपनी अंतर्गत यापूर्वीच अंमलात आणलेले आहेत.

२. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचे शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०२२/प्र.क्र.४९/१८ (र. व का.) दिनांक ०१.१०.२०२२ अन्वये "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" चे औचित्य साधून शासकीय कार्यालयांतील दूरध्वनी/ भ्रमणध्वनीवर अभ्यागतांशी किंवा सहकारी अधिकारी व कर्मचारी यांच्याशी करावयाच्या संभाषणाची सुरुवात "हॅलो" ऐवजी "वंदे मातरम्" या अभिवादनाने करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना व या अभियानाची प्रचार आणि प्रसिध्दी करण्याकरीता पारित करण्यात आलेल्या सूचना कंपनी अंतर्गत सर्व कार्यालयांमधील कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना अवगत करण्यास सक्षम अधिकारी यांनी मंजुरी प्रदान केलेली आहे.

३. महावितरण कंपनीतील सर्व कार्यालय प्रमुख यांना सूचित करण्यात येते की, सोबत जोडलेल्या शासन परिपत्रक दि.०१.१०.२०२२ मधील पारित केलेल्या सुचनांची अंमलबजावणी करावी. तसेच, आपल्या अखत्यारीत कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना शासनाच्या धर्तीवर "वंदे मातरम्" या अभिवादनाचे वापर करण्याकरीता अवगत व प्रोत्साहित करावे.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या e-library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**सोबत:** शासन परिपत्रक दि.०१.१०.२०२२

**(अ.प्र. भादीकर)**
**कार्यकारी संचालक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**
संचालक (संचलन)/ (वित्त)/ (वाणिज्य)/ (प्रकल्प)/ (मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत सस्नेह रवाना:**
१) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/ कल्याण.
२) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.
२) कार्यकारी संचालक (सुवअं)/ (वित्त)/ (महसूल व देयके) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/ (सांघिक वित्त)/ (अंतर्गत लेखा परिक्षण) / (सांघिक लेखा) / (माहिती तंत्रज्ञान) / मुख्य विधी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.

३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.

४) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)

५) महाव्यवस्थापक (मासं)/ (नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

६) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/ मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

७) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**“स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" च्या औचित्यानुसार शासकीय कार्यालयांतील दूरध्वनी / भ्रमणध्वनीवर अभ्यागतांशी किंवा सहकारी अधिकारी / कर्मचारी यांच्याशी करावयाच्या संभाषणाची सुरुवात "हॅलो" ऐवजी "वंदे मातरम्" या अभिवादनाने करण्याबाबत...**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण - २०२२/प्र.क्र.४९/१८(र. व का.),
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : ०१ ऑक्टोबर, २०२२.

**शासन परिपत्रक** :

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर "आजादी का अमृत महोत्सव" अर्थात "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" राज्यात साजरा होत आहे. “स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" चे औचित्य साधून शासकीय कार्यालयांतील दूरध्वनी / भ्रमणध्वनीवर अभ्यागतांशी किंवा सहकारी अधिकारी - कर्मचारी यांच्याशी करावयाच्या संभाषणाची सुरुवात "हॅलो" ऐवजी "वंदे मातरम्" या अभिवादनाने करण्याबाबत मा. मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांनी सर्वांना आवाहन केले आहे.

**"वंदे मातरम्" या शब्दाची ऐतिहासिक पार्श्वभूमी पुढीलप्रमाणे आहे:**

वंदे मातरम् हे बंकिमचंद्र चटर्जी यांनी सन १८७० या वर्षामध्ये लिहिलेले गीत सन १८९६ मध्ये राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात सर्वप्रथम गायले गेले होते. सन १९०५ ला झालेल्या बंगालच्या फाळणी दरम्यान "वंदे मातरम्" हा परवलीचा शब्द होता. अनेक क्रांतिकारकांनी या गीताचा उद्घोष करत करतच बलिदान दिले होते. "इन्कलाब जिंदाबाद" व "वंदे मातरम्" या दोन शब्दांनी स्वातंत्र्य चळवळ भारावून गेली होती. या गीतावर व त्याच्या गायनावरही इंग्रजांनी बंदी घातलेली होती. मात्र तत्कालीन राजकीय पक्ष, क्रांतिकारक व सर्वसामान्य नागरिक यांनी ही बंदी झुगारून वंदे मातरम् गाण्यास सुरुवात केली होती. स्वातंत्र्य चळवळीतील धगधगत्या अग्निकुंडात बलिदान देणाऱ्या अनेक वीरांकडून "वंदे मातरम्" हाच उद्घोष करण्यात येत होता. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील हे सर्वमान्य स्फूर्तिगीत होते. दिनांक १४ ऑगस्ट १९४७ रोजी झालेल्या संविधान

परिषदेच्या बैठकीची सुरुवातही या गीतानेच झालेली होती. तसेच “जन-गण मन"या गीतास राष्ट्रगीत आणि "वंदे मातरम्" या गीतास राष्ट्रीय गीत म्हणून दिनांक २४ जानेवारी, १९५० रोजी संविधान सभेने मान्यता दिली होती.

२. आजही अनेक शासकीय कार्यालयांत संपर्क साधल्यास अधिकारी व कर्मचारी यांच्या संवादास हॅलो या शब्दाने सुरुवात होते. काही ठिकाणी जय हिंद तर काही ठिकाणी नमस्ते असेही संबोधले जाते. वास्तविक पाहता दोन व्यक्ती एकमेकांना सुरुवातीस संबोधित करताना वेगवेगळी अभिवादने वापरताना आढळून येतात. महाराष्ट्रात नमस्कार सारखे संबोधनात्मक शब्द आजही मोठ्या प्रमाणात वापरण्यात येतात. त्याशिवाय हॅलो, हाय, गुड मॉर्निंग सारखे शब्दही दिसून येतात. वेगवेगळे समूह, समुदाय, धर्म यांमध्येही अभिवादन करण्याच्या विविध प्रथा आहेत. वैयक्तिक व सार्वजनिक जीवनात या प्रथा सर्वजण आपापल्या परीने जोपासत आहेत व त्या जोपासण्याचा त्यांना अधिकारही आहे.

३. शासकीय कार्यालयात किंवा शासन व्यवहारात दूरध्वनीवरून किंवा समोरासमोर भेटल्यानंतर कोणत्या शब्दाने अभिवादन करायचे याबाबत स्पष्ट निर्देश नाहीत. तथापि पाश्चिमात्य संस्कृतीचे अनुकरण करताना "हॅलो" हा कोणताही विशिष्ट अर्थ नसलेला व संभाषणकर्त्यांमध्ये कोणतीही आपुलकी न जागवणारा केवळ एक औपचारिक अभिवादन करणारा शब्द आहे. शासकीय व निमशासकीय कार्यालयांत प्राप्त होणाऱ्या दूरध्वनीवरील संभाषणाची सुरुवात बहुतेक वेळा "हॅलो" या शब्दाने होत असल्याने शासकीय / निमशासकीय कार्यालयांशी अभ्यागतांकडून संवाद साधताना जनतेप्रति अपेक्षित असणारी निकटता साधण्यात अडथळे येतात. त्यामुळे “स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" हे औचित्य साधून शासकीय कार्यालयांतील दूरध्वनीवरून होणारे संवाद व समोरासमोर आल्यानंतर होणाऱ्या संवादाची सुरुवात जर "वंदे मातरम्" या अभिवादनाने केली तर संवादकर्त्यांमध्ये परस्परांप्रति एक आपुलकीची भावना निर्माण होऊन पुढील संवाद निश्चितच सकारात्मक होण्यास मदत होऊन त्यातून एक नवीन ऊर्जा मिळू शकेल. तसेच "हॅलो" सारख्या निरर्थक शब्दांचा वापर थांबून राष्ट्राप्रति आदर व्यक्त करणा-या एकसमान शब्दोच्चाराची सवय आपोआपच वृद्धिंगत होईल. राज्यातील हा उपक्रम अन्य राज्यांकरिताही मार्गदर्शक ठरू शकेल.

"स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" हे औचित्य साधून सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालयांत दूरध्वनीवरील संवादाची सुरुवात "हॅलो" ऐवजी "वंदे मातरम्" या अभिवादनाने करण्यात यावी असे आवाहन या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना करण्यात येत आहे. "वंदे मातरम्" या अभिवादनाने दूरध्वनीवरील संवादाची सुरुवात करणे बंधनकारक नसले तरी या आवाहनास प्रतिसाद देऊन "वंदे मातरम्" या अभिवादनाने दूरध्वनीवरील संवादाची सुरुवात स्वयंप्रेरणेने करण्याबाबत सर्व विभागांनी व कार्यालय प्रमुखांनी त्यांच्या आधिपत्याखालील सर्व अधिकारी / कर्मचारी यांना प्रोत्साहित करावे.

**याबाबत सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना खालील प्रमाणे असतील:-**

१) सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालये, शासन सहाय्यित / अनुदानित / अर्थसहाय्यित व इतर स्वरूपाचे साहाय्य असणारी कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, शाळा / महाविद्यालये व शैक्षणिक संस्था तसेच शासन अंगीकृत सर्व प्रकल्प / उपक्रम / आस्थापना येथील कार्यालयांत दूरध्वनी किंवा भ्रमणध्वनीवर अभ्यागत किंवा सहकारी यांनी संवाद साधल्यास "हॅलो" ऐवजी "वंदे मातरम्" या अभिवादनाने सुरुवात करण्यात यावी. तसेच त्यांनी त्यांच्या वैयक्तिक भ्रमणध्वनीवर संवाद साधतानाही "वंदे मातरम्" असे अभिवादन करण्यास सर्व संबंधितांना प्रोत्साहित करण्यात यावे.

२) कार्यालयांत / संस्थांमध्ये येणाऱ्या अभ्यागतांनाही सार्वजनिक जीवनात "वंदे मातरम्" ने अभिवादन करण्याबाबत जाणीव जागृती करावी.

३) ज्या ठिकाणी स्वयंचलित दूरध्वनी यंत्रणा अस्तित्वात आहे त्या ठिकाणीही हा बदल करण्यात यावा.

४) विविध बैठकांमध्ये वक्त्यांनी सुरुवात करताना ती "वंदे मातरम्" या शब्दांनी करावी यासाठी त्यांना प्रोत्साहित करावे.

५) व्यापक जनसंपर्क असणाऱ्या यंत्रणांनी "वंदे मातरम्" अभिवादनाचा अधिकाधिक वापर करावा. उदा. राज्य परिवहन महामंडळाच्या स्थानकांवरील उद्घोषणांची सुरुवात, अंगणवाडी, आरोग्यसेविका यांच्याकडून विविध समाजघटकांशी होणाऱ्या दैनंदिन संवादाची सुरुवात इत्यादी.

**अभियानाची प्रचार आणि प्रसिद्धी :-**

१) "वंदे मातरम्" अभिवादन अभियानासाठी वृत्तपत्रे, वाहिन्या, समाज माध्यमे इत्यादींमधून महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय यांनी माहिती प्रसृत करावी. तसेच "वंदे मातरम्"

अभिवादन वापराबाबत जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी दृक् - श्राव्य माध्यमातून प्रचार- प्रसार करावा.

२) "वंदे मातरम्" या अभिवादानात्मक शब्दांनी सर्वांनी संभाषण, सभेस सुरुवात करण्यासाठी जाणीव जागृती व प्रचार प्रसिद्ध करण्यासाठी स्थानिक पातळीवर जिल्हाधिकारी यांनीही विशेष अभियान राबवावे.

३) लघुचित्रपटांच्या माध्यमातून "वंदे मातरम्" अभिवादनाबाबत जाणीव जागृती करावी.

४) "वंदे मातरम्" हा फक्त नारा किंवा अभिवादन नसून यामागील राष्ट्रभक्तीचा जाज्वल्य इतिहास नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी प्रयत्न करावा.

४. सर्व शासकीय कार्यालये / निमशासकीय कार्यालये, शासकीय अनुदानित व विनाअनुदानित कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, विद्यापीठे, शाळा, महाविद्यालये, शैक्षणिक संस्था तसेच शासन अंगीकृत उपक्रम व आस्थापना यांना "वंदे मातरम्" अभियानात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून हे अभियान यशस्वी करण्याचे आवाहन या परिपत्रकाद्वारे करण्यात येत आहे.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२२१००११६३४३०२८०७ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अ.रा.रेडेकर)
कक्ष अधिकारी

प्रत-

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६. मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य.
८. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

९. मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१०. सर्व मा.मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
११. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१२. सचिव, राज्य निवडणूक आयोग, पहिला मजला, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई-४०० ०३२.
१३. मा.महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१४. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
१५. प्रबंधक, मा. मुंबई उच्च न्यायालय (अपील), मुंबई.
१६. प्रबंधक, मा. मुंबई उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई.
१७. प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, १ ला मजला, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई-४०० ०३२.
१८. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँक ऑफ इंडिया इमारत, मुंबई-४०० ०२३.
१९. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
२०. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई.
२१. राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग, मुंबई.
२२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
२३. सर्व विभागीय आयुक्त.
२४. सर्व जिल्हाधिकारी.
२५. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
२६. मंत्रालयाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख.
२७. भारतीय जनता पक्ष, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बराक नं.१, योगक्षेमसमोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-४०० ०२०.
२८. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस(इं.) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-४०० ०२५.
२९. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष, ठाकरसी हाऊस, जे.एन.हेरेडिया मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई -४०० ०३८.
३०. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-४०० ०२८.
३१. बहुजन समाज पक्ष, प्रदेश सचिव, महाराष्ट्र राज्य, बी.एस.जी.भवन, भूखंड क्र. ८३-ए, कलेक्टर कॉलनी, चेंबूर, मुंबई-४०० ०७४.
३२. भारतीय कम्युनिस्ट पक्ष, महाराष्ट्र समिती, ३१४, राजभवन, एस.व्ही.पटेल मार्ग, मुंबई -४०० ००४.
३३. भारतीय कम्युनिस्ट (मार्क्सवादी) पक्ष, महाराष्ट्र समिती, जनशक्ती सभागृह, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई-४०० ०१३.
३४. महाराष्ट्र नवनिर्माण सेना, राजगड, मातोश्री टॉवर, शिवाजी पार्क, दादर, मुंबई-४०० ०२८.
३५. निवड नस्ती (का.१८), सामान्य प्रशासन विभाग.